# कुमार निर्माण

## प्रवेश अर्ज २०१८

**माहिती व सूचना**

- कुमार निर्माण हा १० ते १५ या वयोगटातील मुला-मुलींसाठीचा - राजकीय, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या नि:पक्ष असा **'शैक्षणिक कार्यक्रम'** आहे.
- कुमार निर्माण ही कुठलीही स्पर्धा नाही
- कुमार निर्माण चे प्राथमिक उद्धिष्ठ मुलांमधील सामाजिक बुद्धिमत्ता विकसित करणे व त्यांच्यामध्ये वैश्विक मानवी मुल्यांची रुजवणूक करणे असे आहे.
- ६ ते १२ मुले-मुली एकत्र येऊन आपला संघ स्थापन करू शकतात.
- **या मुलांच्या संघाला कुमार निर्माण मध्ये आमंत्रित करण्यासाठी एका प्रौढ सदस्याची गरज आहे. – 'निमंत्रक'**
- **निमंत्रक होऊ इच्छीत व्यक्तीने हा प्रवेश अर्ज स्वत: भरून पाठवायचा आहे.**
- निमंत्रकाची प्राथमिक भूमिका
  - मुलांचा संघ बनवणे. हा फॉर्म भरून पाठवणे व अंतिम निवड झाल्यास कुमार निर्माण मध्ये त्यांची सहभाग निश्चिती करणे. (संघ बनवताना शक्यतो गटात नववीची मुले घेऊ नये कारण ती मार्च नंतर दहावीत जातील, गट विस्कळीत होण्याची शक्यता वाढते. पण ही अट नाही)
  - कुमार निर्माण ची संकल्पना स्वतः समजून घेणे व आपल्या संघातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांना ती समजून सांगणे.
  - कुमार निर्माण अंतर्गत आपला संघ विविध कृती, उपक्रम राबवत असताना मुलांना अपाय होणार नाही याची काळजी घेणे
  - संघातील विद्यार्थ्यांशी गरजेनुसार वेळोवेळी संवाद करणे.
  - कुमार निर्माणचा कुठल्याही प्रकारे, कुणीही व्यक्ती वा संस्था - वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा आर्थिक फायद्यासाठी दुरुपयोग करणार नाही याची काळजी घेणे ई.
  - कुमार निर्माण अंतर्गत मिळालेले प्रशिक्षण व इतर सूचनांचे दिलेल्या निर्देशानुसार काटेकोर पालन करणे.
- **या फॉर्ममधील माहिती इथेच न लिहिता स्वतंत्र कागदावर किंवा ईमेल वर सविस्तरपणे लिहून पाठवावी.**
- भरलेला फॉर्म contact.knirman@gmail.com या ईमेल वर अथवा "एम.के.सी.एल नॉलेज फौंडेशन, पाचवा मजला, बी विंग, आय.सी.सी. ट्रेड टॉवर, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे - ४११०१६" या पत्त्यावर पाठवावा
- अधिक माहितीसाठी संपर्क : शैलेश – ९५०३०६०६९८, प्रणाली – ९७६७४८८३३७

संकेतस्थळ : http://mkclkf.org/kumarnirman फेसबुक : https://www.facebook.com/Kumar-Nirman-Maharashtra-Social-Olympiad-579953625382774/

**कुमार निर्माण**

# प्रवेश अर्ज २०१८

**हा अर्ज इथे न भरता, दुसऱ्या कागदावर / कॉम्पुटरवर सविस्तर लिहून पाठवावा**

1. नाव
2. जन्म तारीख
3. लिंग
4. फोन नं.
5. ई मेल id
6. सध्याचा पत्ता
7. मूळ पत्ता
8. झालेले शिक्षण
9. सध्याचा व्यवसाय/नोकरी
10. कुटुंबाची पार्श्वभूमी व सदस्यांविषयी थोडक्यात माहिती
11. तुमचे छंद
12. तुम्हाला 'कुमार निर्माण' बद्दल कुठून कळाले?
13. तुम्ही वाचलेली व तुम्हाला आवडलेली अशा ५ पुस्तकांची नावे सांगा
14. तुमच्या मते तुम्ही आजवर मिळवलेले सर्वात मोठे यश कुठले? का? (२०० शब्द)
15. तुम्हाला आजवर अनुभवास आलेले सर्वात मोठे अपयश कुठले? किंवा अनुभवलेला सर्वात कठीण काळ कुठला? व त्याला तुम्ही कसा प्रतिसाद दिला? (२०० शब्द)
16. तुम्हाला कुमार निर्माण मध्ये का सहभागी व्हावेसे वाटते? (२०० शब्द)
17. आजच्या शालेय शिक्षण व्यवस्थेविषयी तुमचे सकारात्मक व नकारात्मक दोन्ही विचार वर्णन करा. (३०० शब्द)
18. सामाजिक क्षेत्राशी संबंधित तुमचे प्रत्यक्ष अनुभव वर्णन करा. नसल्यास, मनातील इच्छेला प्रत्यक्षात आणण्यासाठी आजवर काय अडचणी जाणवल्या? सविस्तर लिहा. (२०० शब्द)
19. तुमच्या आयुष्यावर/विचारांवर/कृतींवर ज्यांचा प्रभाव पडला आहे अशा एक-दोन व्यक्तींबद्दल लिहा. असे का वाटते हे देखील नमूद करा. (नजीकचे नातेवाईक सोडून) (२०० शब्द)
20. समाजातील काही घटना अनुभवून तुम्हाला सात्विक संताप आला किंवा करूणा वाटली त्याबद्दल वर्णन करा. (२०० शब्द)
21. कुमार निर्माण अंतर्गत शालेय मुलांसोबत काम काम करताना कामी येतील अशी कोणती कौशल्ये व अनुभव तुमच्याकडे आहेत? सविस्तर लिहा. (२०० शब्द)